REVIEW OF RESEARCH

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळेश्वर ता. मोहोळ येथील इ. ४ थी तील विद्यार्थ्यांना वाचनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे

कैलास शिंदे

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## १. प्रस्तावना :-

प्राथमिक स्तरावर आज जिल्हा परिषद शाळेतील इ. ४ थी वर्गातील वाचनात अडखळपणे ही फार मोठी समस्या आहे. शैक्षणिक वर्ष चालू होण्याच्या वेळी पालक उत्स्फुर्तपणे आपल्या पाल्यासह शाळेत येतात. काही पालक शैक्षणिक साहित्याची यादी मागण्यासाठी येतात. पण तो उत्साह फार काळ राहतोच असे नाही. अर्थात याला सर्वच पालक लागू होतात असेही नाही. हळूहळू पालकांचे शाळेकडे येण्याचे फारच कमी प्रमाणात असते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळेश्वर येथे मी निरीक्षण केले असता असे दिसून आले की इ. ४ थी च्या वर्गातील काही विद्यार्थी वाचताना अडखळतात.

## २. समस्या विधान :-

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळेश्वर ता. मोहोळ येथील इ. ४ थी तील विद्यार्थ्यांना वाचनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांची परिणाम कारकता अभ्यासणे**

## ३. कृतिसंशोधन समस्या सुस्पष्टता :-

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळेश्वर ता. मोहोळ येथील इ. ४ थी तील विद्यार्थी वाचन करताना अडखळतात, चुकीचा उच्चार करतात. अशा मुलांची यादी तयार केली. त्या मुलांच्या पालकांची भेट घेतली . पालकांना पाल्यांच्या वाचनातील होणाऱ्या चुका समजावून सांगितल्या. मुलांच्या समस्या समजावून घेतल्या, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या त्या अडचणी सोडविण्यासाठी मी स्वत:च्या खर्चाने लेखन साहित्य, १९ खडी मी वाचणारच या साहित्याचे वाटप केले.दररोज मी वाचणारच या पुस्तकांतील विविध चित्रे, चित्रातील साहित्य, याचे निरीक्षण करून घेतले दररोज एका पानावरील कृतीयुक्त शब्दांचे वाचन करून घेण्यास सुरूवात केली. कृतीयुक्त बाराखडी वाचन करताना मुलांना आनंद वाटू लागला आणि हळूहळू बाराखडीची चांगली ओळख व पाठांतर करण्यास मदत होऊ लागली. अप्रगत मुलांची लेखन साहित्य व १९ खडी पुस्तक दिल्यामुळे कृतीयुक्त बाराखडी पाठांतर होऊ लागली व साधे व सोपे शब्द वाचण्याचा प्रयत्न करू लागली.

## ३. समस्या उद्दिष्टे :-

१.मुलांच्या प्रकटवाचनातील चुकांचा शोध घेणे.
२. मुलांसाठी विविध उपक्रम राबविणे.
३. उपक्रमांची परिणामकारकता तपासणे.
४. मुलांना वाचनाची गोडी लावणे.

## ४. संशोधनाची कार्यपद्धती -

## ५. कृति आराखडा नियोजन अनुभव :-

जि.प प्रा. केद्रशाळा सावळेश्वर ता मोहोळ येथे इयत्ता ४ थी ब च्या वर्गात ३१ विद्यार्थी आहेत.३१ विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थी अप्रगत आहेत त्यांना प्रगत करण्यासाठी मुलांचे पाच, पाच विद्यार्थ्यांचे गट केले. प्रत्येक गटास २ प्रगत व ३ अप्रगत असे गट तयार केले. गटाचे नेतृत्व प्रगत विद्यार्थ्यांकडे दिले.१.कृतीयुक्त शब्द वाचन २. कृतीयुक्त बाराखडी वाचन दररोज १ तास सराव घेण्यासाठी वेळेचे नियोजन करण्यात आले. अप्रगत विद्यार्थ्यांच्या पालकांना मुलांची सध्याची वाचनाची परिस्थिती समजावून सांगण्यात आली. व या मुलांना प्रगत करण्यासाठी काय नियोजन केले आहे हे समजावून सांगितले व त्यांची नोंद पालक भेट रजिस्टरमध्ये ठेवण्यात आली.

## मुलांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपाय योजना :-

१.मुलांना खेळातून शिक्षण, शिक्षणातून खेळ घेतले .
२. विविध प्रकारचे खेळाचे साहित्य, वापरले.
३.शब्द कोंडी, शब्दपट्टया , बोलक्या पताका इ. चा वापर केला.
४. फुलांची नावे पक्ष्यांची नावे इ. पट्या वापरल्या.
५. मित्र, मैत्रिणी , नातेवाईकांची नावे वाचन सराव घेतले .
६. नातेसंबंध ओळखणे.
७. प्राणी , पक्षी जोड्या जुळविणे.

८. शब्दांचा डोंगर तयार करणे.
९. अक्षरापासून अनेक शब्द तयार करणे.

**६. संशोधन साधने :-**प्रस्तुत संशोधनासाठी पडताळा सूची या साधनाचा अवलंब केला आहे.

**पडताळा सूची :-**प्रकट वाचनाची समस्या निवडून पडताळा सूचीच्या साहाय्याने प्रकट वाचनासाठी आवश्यक असणारे मुद्दे निवडले व प्रत्येक मुद्द्याला गुणदान ठेवून प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक मुद्दा पडताळून पाहिला व गुणांकन केले .

**७. उपक्रमांची माहिती :-**

१.शब्दकार्ड वाचन सराव (दररोज १ तास -७ दिवस)
२.मुळाक्षरे व स्वरांची ओळख कृतीयुक्त वाचन (दररोज १ तास, ७ दिवस)
३. स्वर व स्वरचिन्हांची ओळख कृतीयुक्त वाचन सराव (दररोज १ तास ७ दिवस)
४.जोडाक्षरे वाचन सराव (दररोज १ तास ७ दिवस)
५. चिन्हांची ओळख वाचन सराव (दररोज १ तास ७ दिवस)
६. आंतराष्ट्रीय हात धुवा दिन १५ ऑक्टोबर स्वच्छतेचे संदेश वाचन सराव
७. आरोग्याच्या चांगल्या सवयींचे वाचन सराव.
८. वर्गातील शैक्षणिक तक्त्यांचे वाचन सराव.
९. मराठी महिने, इंग्रजी महिने, आठवड्याचे वार, दिशा व उपदिशा , वाचन, सराव .
१०. मित्रांची नावे वाचन सराव.
११. फळांची , पक्ष्यांची , प्राण्यांची नावे वाचन सराव.

**८.उपायांची परिणामकारकता :-**

१.माझ्या इ. ४ थी ब च्या वर्गातील पटसंख्या ४२ आहे. त्यातील ४२ म्हणजे सर्व मुलांना वाचता येऊ लागले.   २. माझ्या वर्गातील १०० टक्के मुले प्रगत दिसून आली.
३. सर्वच मुलांना वाचता येऊ लागल्यामुळे त्यांच्यातील प्रगत / अप्रगत ही दरी कमी झाली.
४. आपल्या पाल्यांना वाचता येते हे पाहून पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद दिसू लागला.
५. अनेक पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष न दिल्यामुळे दिलगिरी व्यक्त केली.
६. प्रत्येक पालकांनी पाल्याकडे लक्ष देण्याची स्वत:हून जबाबदारी स्विकारली.
असे अनेक सकारात्मक बदल मला मी केलेल्या संशोधनामधील उपायावरून दिसून आले.

**संदर्भ साहित्य**


| अ.क्र | लेखक | पुस्तक | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. | कै. मो. रा. वाळंबे | सुधारित आवृत्ती २०११ सुगम मराठी व्याकरण लेखन | नितीन प्रकाशन पुणे -३० |
| २. | श्री किरण बाबर | १९ ,खडी मी वाचणारच | तुळजाई प्रकाशन उस्मानाबाद |
| ३. | डॉ. हेमलता पारसनिस | शैक्षणिक कृतिसंशोधन | नूतन प्रकाशन पुणे |


LBP PUBLICATION